राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान अंतर्गत मुलींचे वसतीगृह या योजनेसाठी सन २०१७-१८ करीता राज्य हिस्सा रु.९७७.२० लक्ष इतका निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः आरएमएसए-२०१७/(२०८/१७)/एस.डी.६
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२
तारीख: १४ फेब्रुवारी, २०१८

वाचा -

१) विभागाचा शासन निर्णय क्रमांकः मॉडेल स्कूल-२०११/(१४२/११)/माशि-७, दि. २३ मे, २०१२.

२) विभागाचा शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण २४१७/(४६/१७)/अर्थसंकल्प, दि. १० ऑगस्ट, २०१७.

३) वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल, २०१७.

४) वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दिनांक ३० जून, २०१७.

५) केंद्र शासनाच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाचे क्र. F.No.३-८/२०१०-Sch.१/ RMSA- IV, दि. २७ नोव्हेंबर, २०१७ चे पत्र.

प्रस्तावना -

केंद्र शासनाच्या अकराव्या पंचवार्षिक योजना कालावधीत माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणापासून मुली वंचीत राहू नये या दृष्टीने इयत्ता ९वी ते १२ मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थीनींच्या निवासा करिता, देशातील शैक्षणिकदृष्टया अप्रगत गटांमध्ये मुलींचे वसतीगृह ही योजना सुरु केली आहे. या योजनेंतर्गत १४ ते १८ वयोगटाच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या १०० मुलींकरिता एक याप्रमाणे राज्यातील १० जिल्ह्यातील शैक्षणिक दृष्टया अप्रगत असलेल्या ४३ गटामध्ये मुलींचे वसतीगृह इमारत बांधकामे सन २०१०-११ मध्ये मंजूर केली आहेत.

राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानांतर्गत मुलींचे वसतीगृह ही योजना केंद्र पुरस्कृत योजना असून, या योजनेचे स्वरुप केंद्र हिस्सा ६०% व राज्य हिस्सा ४०% असे आहे. राज्य शासनाने मुलींचे वसतीगृह इमारत बांधकामाकरिता प्रस्तावित केलेल्या नवीन एकक किंमतीनुसार केंद्र शासनाने ३६ गटातील मुलींचे वसतीगृह बांधकामासाठी एकक रक्कम मंजूर करून सदर बांधकामाच्या नवीन एकक रकमेच्या अंदाजपत्रकास दि.७ एप्रिल, २०१६ रोजी झालेल्या केंद्र शासनाच्या प्रकल्प मान्यता मंडळाच्या (PAB) बैठकीच्या इतिवृत्तानुसार मान्यता दिली आहे. त्यानुसार सदर ३६ गटातील मुलींचे वसतीगृह बांधकामासाठी केंद्र शासनाने सन २०१६-१७

मध्ये रु. ९१४४.२३ लक्ष च्या प्रस्तावास मान्यता दिली. केंद्र शासनाच्या दि. २७ नोव्हेंबर, २०१७ च्या पत्रान्वये केंद्र शासनाने मुलींचे वसतीगृह या योजनेकरिता एकूण रु.२५५९.५८ लक्ष इतका निधी यापूर्वीच वितरित केलेला आहे. त्यास अनुसरुन राज्य शासनाच्या हिश्याचा निधी, सात गटातील मुलींचे वसतीगृह करिता रु.८९.५४ लक्ष व ३६ गटातील मुलींचे वसतीगृह बांधकामासाठी रु.११६९.१५ लक्ष असा एकूण रु.१२५८.६९ लक्ष इतका निधी वितरीत करावयाचा आहे. यापैकी राज्य शासनाने रु.२८१.४९ लक्ष इतका निधी यापूर्वीच वितरीत केला असल्याने उर्वरित रक्कम रु.९७७.२० लक्ष इतका निधी राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानांतर्गत मुलींचे वसतीगृह योजनेसाठी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानांतर्गत मुलींचे वसतीगृह या योजनेंतर्गत शैक्षणिक दृष्ट्या अप्रगत ३६ गटातील, मुलींच्या वसतीगृहाची बांधकामे पूर्ण करण्याकरीता रु.९७७.२० लक्ष (अक्षरी रूपये नऊ कोटी सत्त्याहत्तर लक्ष वीस हजार फक्त) निधी वितरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता मागणी क्र.ई-४, ४२०२, शिक्षण, क्रीडा, कला व संस्कृती यांवरील भांडवली खर्च, ०१, सर्वसाधरण शिक्षण, २०२, माध्यमिक शिक्षण (००) (००)(०२) मुलींसाठी वसतीगृह बांधणे (राज्य हिस्सा) (४२०२ ६१६६) ५३, मोठी बांधकामे या लेखाशीर्षांतर्गत उपलब्ध तरतुदीतून रु. ९७७.२० लक्ष इतका निधी वितरित करण्यात यावा.

३. वरील खर्च वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि. १८.४.२०१७ च्या परिपत्रकातील सूचनांनुसार करण्यात यावा. यासाठी सहसचिव (प्रशासन), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी, तसेच अवर सचिव/कार्यासन अधिकारी (रोखशाखा), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आंहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भाधीन दि. १८.४.२०१७ व दि. ३०.६.२०१७ च्या परिपत्रकास अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे. वित्त विभागाच्या दि. १८.४.२०१७ परिपत्रकातील परिच्छेद ७ ते १८ मधील अटींची तसेच परिपत्रकाच्या परिशिष्टातील अनुक्रमांक ८ मध्ये नमूद अटींची पूर्तता होत आहे. तसेच सदर रु.९७७.२० लक्ष निधी वितरित करण्याच्या प्रस्तावास नियोजन विभाग आणि वित्त विभागाने अनुक्रमे अनौपचारिक

संदर्भ क्र. ९ /१४७१, दिनांक १५ जानेवारी, २०१८ व अनौपचारिक संदर्भ क्र. ७९/व्यय-५, दिनांक २४ जानेवारी, २०१८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१४११४८१३०८२१ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suryakant B. Patil

Digitally signed by Suryakant B. Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1e4d61e2654004fd87056f70e5ae32fb1d62013750a34b063c53c71f673388b9, cn=Suryakant B. Patil
Date: 2018.02.14 11:56:26 +05'30'

(सु. ब. पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.

२) मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

३) मा. विरोधी पक्ष नेता, (विधान सभा/ विधान परिषद), विधानभवन, मुंबई.

४) सर्व मा. विधान सभा सदस्य/ विधान परिषद सदस्य, विधानभवन, मुंबई.

५) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय, मुंबई.

६) मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.

७) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.

८) राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, मुंबई.

९) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे.

१०) सहसचिव (प्रशासन), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

११) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१ व २ मुंबई/नागपूर.

१२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१ व २ मुंबई/नागपूर.

१३) संचालक, लेखा व कोषागारे, पुणे.

१४) वरिष्ठ कोषाधिकारी, जिल्हा पुणे.

१५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/वांद्रे

१६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.

१७) शिक्षणाधिकारी(माध्यमिक), जिल्हा परिषद(सर्व)

१८) वित्त विभाग, (व्यय-५/अर्थसंकल्प शाखा), मंत्रालय, मुंबई.

१९) कार्यासन अधिकारी, (अर्थसंकल्प/रोखशाखा), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

२०) निवड नस्ती, एसडी-६.